**उपविभागिय जलसंधारण अधिकारी, जि.प.उपविभाग (लपा) कुडाळ**

पत्ता – हॉटेल गुलमोहर जवळ, तालूका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग 416520

पत्रक्र./उपविजसंअधि/जिप/लपा/आस्था-1/ 346 /2025

दिनांक –07/11 /2025

# निरुपयोगी व विनावापर पडून असलेले कार्यालयीन साहित्याच्या लिलावाची नोटीस

जिल्हा परिषद (लपा) उपविभाग कुडाळ कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयातील निरुपयोगी व विनावापर पडून असलेले कर्यालयीन साहित्य जिथे आहे त्याच स्थितीमध्ये लिलावने विकण्याचे आहे. यासाठी दिनांक १८/११/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता मा.उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.(लपा) उपविभाग कुडाळ यांचे दालनामध्ये लिलाव आयोजित केलेला आहे.

| अ.क्र. | लिलाव साहित्याचा तपशील | शासकिय मुल्यांकन रक्कम रुपये | लिलावाचे ठिकाण | लिलावाची तारिख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | जि.प.(लपा) उपविभाग कुडाळ या कार्यालयाकडील निरुपयोगी व विनावापर कार्यालयीन साहित्य | रु.६७०/-(अक्षरी र.रु.सहाशे सत्तर मात्र) | जि.प.(लपा) उपविभाग कुडाळ | दिनांक १८/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता. |
| २. | निरुपयोगी ,बंद शेतीपंप व साहित्य | रु.२९५८०/-(अक्षरी र.रु.एकोणतीस हजार पाचशे ऐंशी रू. मात्र) | | |

## लिलावाबाबतच्या अटी व शर्ती

०१.जिल्हा परिषद (लपा) उपविभाग कुडाळ कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयातील निरुपयोगी व विनावापर पडून असलेले कार्यालयीन साहित्य जिथे आहे त्याच स्थितीमध्ये लिलावाने विकण्याचे आहे.

०२.कुडाळ तालुक्यातील स्थानिक बोलीधारकाला प्रथम प्राधान्य दिले जाईल.

०३.सर्व दर GST अंतर्गत करून देणेचे आहेत.

०४.लिलावाचे विकणेचे साहित्य लिलावापूर्वी दिनांक १०/११/२०२५ पासून १८/११/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत कार्यालयामध्ये पहावयास मिळेल. बोलीदाराने साहित्याची तपासणी केली आहे, असे गृहीत धरण्यात येऊन, मागाहून मालाची कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

०५. लिलावामध्ये बोली करण्यापूर्वी र.रु.५००/- ची अनामत रक्कम जमा करावी त्याशिवाय बोलीमध्ये भाग घेता येणार नाही.

०६. लिलावात भाग घेणा-या बोलीधारकांनी साहित्याची पहाणी झाल्यावर दि.१८/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता बोलीसाठी मा.उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.(लपा) उपविभाग कुडाळ यांचे दालनामध्ये उपस्थित राहणेचे आहे.

Scanned with OKEN Scanner

०७. लिलावात भाग घेणा-या बोलीधारकांपैकी ज्या बोलीधारकाची बोली जास्त असेल त्याचे नावे लिलाव मंजूर केला जाईल.

०८. लिलावातील निरुपयोगी / नादुरुस्त साहित्य आहे त्या स्थितीत लिलाव करणेत येत असल्यामुळे लिलाव झाल्यावर कोणतीही वस्तु गहाळ झाल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

०९. लिलावाच्या ठिकाणी तालुकास्तरीय निर्लेखन समितीला लिलावाच्या संदर्भात अंतिम निर्णय राहील.

१०. लिलाव केल्यानंतर व लिलाव कायम केल्याबददल बोलीदारास कळविण्यात असल्यापासून १५ दिवसांचे आत सर्व रक्कम भरणा करून साहित्य कार्यालयी दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घेणे आवश्यक आहे. ठरवून दिलेल्या १५दिवसाच्या मुदतीत न भरल्यास १३ % दराने व्याज आकारण्यात येईल. सदरची मुदत १५दिवसाची राहिल. तदनंतर रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

११.बोलीदाराने १५दिवसांच्या आत साहित्य ताब्यात न घेतल्यास तदनंतर प्रतिदिन रु.१००/-(रुपये शंभर मात्र) दंड आकारण्यात येईल. ९०दिवसांच्या आत साहित्य ताब्यात न घेतल्यास निर्लेखन समितीला लिलाव रदद करण्याचा अधिकार राहिल व संबंधित लिलाव खरेदीदाराची अनामत रक्कम व ९० दिवसांची दंडाची रक्कम वसून करून उर्वरीत रक्कम देण्यात येईल.

१२.लिलाव खरेदीदाराने साहीत्य ताब्यात घेताना कार्यालयाच्या इमारतीचे/मालमत्तेचे नुकसान झाल्यास लिलाव खरेदीदाराला झालेल्या नुकसानीबाबत जबाबदार ठरवण्यात येईल.

१३.लिलाव धारकाने साहित्य नेण्यासाठी वाहतूक व्यवस्था करणेची आहे. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा वाहतूक किंवा वाहतूक भाडे भत्ता अदा केले जाणार नाही.

१४. कोणत्याही बोलीदाराची बोली कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकारी तालुकास्तरीय निर्लेखन समितीस राहतील.

१५.एकदा जाहीर केलेल्या मालाचा / साहित्याचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार तालुकास्तरीय निर्लेखन समितीस राहील.

सदस्य/सचिव
उपविभागीय जलसंधारण अधिकारी
जि.प.(लपा) उपविभाग कुडाळ

प्रत- कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी

प्रत- पंचायत समिती कुडाळच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी सविनय सादर

Scanned with OKEN Scanner